**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वैशपाल होमचंद्र कांबळे, : अपिलार्थी
रा. कोठारी (सिं), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोठारी (सिं), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोठारी (सिं), तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३१-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये अनुसुचित जाती उपयोजना (विशेष घटक योजना) अंतर्गत मंजूर मौजे कोठारी (सिं), तालुका किनवट, जिल्हा नांदेड येथील पाणीपुरवठ्याबाबतची माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना देण्यात आली नाही असे दिसून येत आहे.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वैशपाल होमचंद्र कांबळे, रा. कोठारी (सिं), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कोठारी (सिं), तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गव्हाणे विनायक मारोतराव, : अपिलार्थी
आनंद सदन, रामनगर, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/०००४

२ सुनावणीची तारीख दि. ०२-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी, : अनुपस्थित
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०८-१०-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १६-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत
उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गव्हाणे विनायक मारोतराव, आनंद सदन, रामनगर, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. वासुदेव मुरलीधरराव परळे,<br>८, सप्तगिरी कॉलनी, तरोडा (बु.), नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/०००५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०१-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये सन १९९१ पासून खालील दोन मुद्दयांवर माहिती मागितली आहे.

१. उपरोक्त कालावधीमध्ये अधिकारी / कर्मचारी यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असल्यास त्या संदर्भातील आदेशाच्या प्रती.

२. ज्या नियमानुसार सक्तीच्या रजेवर पाठविले असेल त्या शासन निर्णयाची प्रत.

अपिलार्थी यांच्या माहितीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार दिनांक ०९-१०-२००९ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन माहिती कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि शासन निर्णयाची प्रत पाठविल्याचे दिसून येत नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वासुदेव मुरलीधरराव परळे, ८, सप्तगिरी कॉलनी, तरोडा (बु.), नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पाटील नामदेवराव शंकरराव, कात्रजकर, : अपिलार्थी
संपादक, साप्तहिक शिवप्रताप, एन. डी. ३१, हडको,
नवीन नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम प्राथमिक शाळा, मुलांचे,
लालबाडा, नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम प्राथमिक शाळा, मुलांचे<br>नांदेड - श्री. म. अकबर म. नवाज | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिश: उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पाटील नामदेवराव शंकरराव, कात्रजकर, संपादक, साप्तहिक शिवप्रताप, एन. डी. ३१, हडको, नवीन नांदेड ,४३१६०३.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मदिनातुल उलुम प्राथमिक शाळा, मुलांचे , लालबाडा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. केशर रामचरण जयस्वाल, : अपिलार्थी
व्दारा जी. टी. खोत,
पेट्रोल पंपाजवळ, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, श्री. शंकरराव चव्हाण विद्यालय, आष्टा,
तालुका माहुर, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. शंकरराव चव्हाण विद्यालय, आष्टा, तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. वि. ना. जोशी, अधीक्षक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १९-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २४-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्याकडे श्री. शंकरराव चव्हाण विद्यालय, आष्टा, तालुका माहुर, जिल्हा नांदेड या विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या विना अनुदानित काळातील (सर्व कालावधी) बँकेत भरणा केलेल्या व्यवसाय कराचे माहवारी विवरण मागितले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १५-०७-२०१० रोजी सुनावणी झाली असून त्यावेळी माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पूर्ण माहिती देण्याचे कबूल केले होते. त्यानुसार अपिलार्थीस माहिती दिलेली आहे व त्याची पोच अपिलार्थी यांनी दिली आहे. कागदपत्रा-वरुन या बाबी दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या इतर माहितीकरिता ते स्वतंत्र अर्ज करु शकतात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. केशर रामचरण जयस्वाल, व्दारा जी. टी. खोत, पेट्रोल पंपाजवळ, गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शंकरराव चव्हाण विद्यालय, आष्टा, तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मनोहर गुंडेराव वाघमारे,<br>मु. सुगांव (खुर्द), पो. सुगांव (कॅम्प), तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड - ४३१ ७१५ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुगांव (खुर्द),<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुगांव (खुर्द),<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, मुखेड,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-०४-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | २०-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८-०७-२०१० फेरसादर दिनांक २०-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर गुंडेराव वाघमारे, मु. सुगांव (खुर्द), पो. सुगांव (कॅम्प), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड - ४३१ ७१५.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सुगांव (खुर्द), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लष्करे प्रकाश गोविंद (वरटी), : अपिलार्थी
मु. पो. बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड - श्री. पी. एम. आडे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकूण दोन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे आढळून आले आहे म्हणून त्यांनी कार्यभार हाती घेतल्याबरोबर दिनांक १३-११-२०११ रोजी अपिलार्थीस माहिती दिली आहे. या बाबतची त्या दिवशी अपिलार्थीने लेखी पोच दिली आहे. ही बाब कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लष्करे प्रकाश गोविंद (वरटी), मु. पो. बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बोधडी (बु.), तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कंधारे बाबाराव परशराम, : अपिलार्थी
मु. पो. वाई (बाजार), तालुका माहुर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाई (बाजार), तालुका माहुर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाई (बाजार), तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. ए. व्ही. देशमुख, विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २२-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०८-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये ग्रामपंचायत कार्यालय, वाई (बाजार), तालुका माहुर, जिल्हा नांदेड येथील एकूण सहा मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही ही बाब अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिलामध्ये नमूद केलेली आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-०५-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कंधारे बाबाराव परशराम, मु. पो. वाई (बाजार), तालुका माहुर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाई

(बाजार), तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, माहुर, तालुका माहुर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालाजी बळीराम बंडे,<br>माजी जिल्हा परिषद सदस्य,<br>शिवालय, संपर्क कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालाजी बळीराम बंडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. शेख नजीरोद्दीन, विज्ञान सल्लागार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०४-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०९-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०८-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये अहिल्याबाई होळकर प्राथमिक कन्या शाळा, मुखेड या शाळेसंदर्भात एकूण पाच मुद्दयांवर माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ०९ एप्रिल २०१० ला माहिती कळविली आहे. त्यामध्ये त्यांना मुद्दा क्रमांक १,२ व ३ ची माहिती प्राप्त झाली आहे. तथापि खालील मुद्दयांवरील माहिती प्राप्त झाली नाही ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक ४ : अहिल्याबाई होळकर प्राथमिक कन्या शाळा या शाळेचा अनुदानासाठी प्रस्ताव प्राप्त झाला असल्यास त्याची माहिती व प्रमाणित प्रती.

२. मुद्दा क्रमांक ५ : अनुदानासाठी प्रस्ताव पाठविल्याच्या वेळेस नांदेड जिल्हा परिषद (शिक्षण विभागाने) मंजुरीसाठी शिफारस केली असल्यास त्याची नक्कल.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, मुद्दा क्रमांक १,२ व ३ ची माहिती अपिलार्थीस दिली आहे. मुद्दा क्रमांक ४ व ५ ची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे असल्याबाबतचे अपिलार्थी यांना कळविण्यात आले. तथापि ही बाब आयोगास योग्य वाटत नाही, कारण मुद्दा क्रमांक ४ व ५ ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्याचा निर्णय आयोगातर्फे घेण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी अपील सुनावणीसाठी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता मुद्दा क्रमांक १ ते ३ तसेच मुद्दा ४ व ५ याच्या छायांकीत प्रमाणीत प्रतिसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. याकरिता या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये त्यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक ०७-०६-२०१२ रोजी दुपारी ०३-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालाजी बळीराम बंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य, शिवालय, संपर्क कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानिवार, : अपिलार्थी

मु. पो. वेलामपुरा, वार्ड क्रमांक ३, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग
क्रमांक १, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४३

२ सुनावणीची तारीख दि. ०२-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग
क्रमांक १, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

- श्री. डी. बी. निळकंठ

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १२-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १८-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५-०५-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत अशी माहिती मागितली आहे.

या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती देय होत आहे ती माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

त्याचप्रमाणे संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, किनवट यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती देय होत आहे त्या माहितीसंदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

२.  संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, किनवट यांना रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यादवराव मुकूंदराव नेम्मानिवार, मु. पो. वेलामपुरा, वार्ड क्रमांक ३, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री.शर्मा राजेंद्र हरीनारायण,<br>रा. नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,उमरी,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,उमरी,<br>जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री.शर्मा राजेंद्र हरीनारायण | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,उमरी,जि.नांदेड - श्री. एस.एन.राऊत | : | उपस्थित |
| ३.३ | तत्कालीन जन माहिती अधिकारी- श्री. एस.पी.राठोड, नायब तहसीलदार | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,उमरी,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १४.१२.२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २०.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३.०४.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,सध्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २१.१०.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये जानेवारी, २००८ ते ऑक्टोबर, २००९ या कालावधीमध्ये उमरी मुख्यालयातील सर्व अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांनी किरकोळ विक्रेत्यांना विक्री केलेल्या स्टॉक व विक्री रजिस्टरच्या प्रती, मासिक प्रपत्र-अ, कार्डधारकांना विक्री केलेल्या विक्री रजिस्टरच्या सत्यप्रती व कार्डधारकांची यादी अशी माहिती मागितली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु) यांनी सदरची माहिती संदर्भित घाऊक व किरकोळ विक्रेते यांच्याकडे असल्यामुळे त्यांना माहिती देण्याकरिता सूचित केले आहे व विक्रेत्यांनी माहितीच्या छायांकित प्रती काढण्याकरिता लागणाऱ्या शुल्काची रक्कम त्यांना कळविली आहे. तथापि शुल्क भरण्याकरिता अर्जदारास कळविण्यात आल्याचे दिसून येत नाही. अर्जदार दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती जसे मासिक प्रपत्र -अ व कार्डधारकांची यादी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे. ती अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत जन माहिती अधिकारी अपिलार्थीस देऊ शकले असते. तथापि अशी कृती केल्याचे आढळून येत नाही. याकरिता भविष्यात ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. उमरी येथे एकंदर सात अर्धघाऊक केरोसिन विक्रेते आहेत. नेमक्या १-२ दुकानांची माहिती मागितली असल्यास प्रभावीपणे त्वरित कार्यवाही करणे जन माहिती अधिकारी यांना शक्य झाले असते, ही बाब अपिलार्थी यांनी लक्षात घेणे जरुरी आहे. या सर्व बाबी विचारात घेता जी माहिती उपलब्ध आहे, ती त्वरित नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी व उर्वरित माहितीसंदर्भात किरकोळ केरोसिन विक्रेते व अर्धघाऊक विक्रेते यांच्याकडील अभिलेखे अपिलार्थीस पाहणीसाठी उपलब्ध करुन देऊन त्यातील आवश्यक काही कागदपत्रे विनामूल्य द्यावीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 2(j) नुसार 'माहितीचा अधिकार' या व्याख्येनुसार माहितीची पाहणी हा प्रथम पर्याय दिलेला आहे. अत: माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली, असा होतो. यासर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात तसेच या संदर्भात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, उमरी, ता.उमरी,जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहितीच्या प्रती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य द्याव्यात तसेच अभिलेख्यांची पाहणी देण्याची कार्यवाही करावी. ही संपूर्ण कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.शर्मा राजेंद्र हरीनारायण, हरी कि गंगा, कोनार्क विहार, फरांदे नगर (काबरा नगरच्या पुढे), नांदेड- ४३१ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,उमरी, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,उमरी,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दशरथराव मंगाजी लोहबंदे,<br>रा.पांडुर्णी, पो.वसंतनगर, ता.मुखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.डी.बोथीकर, नायब तहसीलदार(महसूल) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०३.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये माहे जानेवारी,२०१० ते मे, २०१० या काळात महिनावार काढलेले नियतन, अन्नपूर्णा, अंत्योदय, बीपीएल,एपीएल, शालेय पोषण, किशोली मुली,रेशन इ. योजनेसंदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे.याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०७.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दशरथ मंगाजी लोहबंदे, रा. पांडुर्णी, पो. वसंतनगर,ता. मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु.),तहसील कार्यालय,मुखेड, ता. मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राजकुमार गोविंदराव आडगुलवार,<br>रा.मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,पुरवठा विभाग,मुखेड,<br>ता.मुखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजकुमार गोविंदराव आडगुलवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.डी.बोथीकर, नायब तहसीलदार (म.) | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ११.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १९.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०७.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(३) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत सादर केलेले नसून विलंबाने सादर केलेले आहे. एकंदर १२० दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येत आहे. या विलंबाकरिता समर्थनीय कारण अपिलार्थी त्यांच्या युक्तिवादाचे वेळी देऊ शकले नाहीत. ही बाब विचारात घेता अपील दाखल स्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजकुमार गोविंदराव आडगुलवार, साईनाथ नगर, बसस्टॅन्डच्या पाठीमागे, मुखेड, जि.नांदेड-४३१ ७१५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामराव हैबतराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी,तलाठी सजा डोणगाव,ता.मुदखेड,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,मुदखेड,ता.मुदखेड,जि.नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी,तलाठी सजा डोणगाव,ता.मुदखेड,जि.नांदेड - श्री. कोटुरवार एस.एम. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,मुदखेड,ता.मुदखेड,जि.नांदेड | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस.एस.मांगुळकर,लिपीक | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०२.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०८.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०१.२०१० |

(फेरसादर दि.०५.०३.२०१०)

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ११.११.२००९ रोजीच्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे.

"१) मौ. डोणगाव, ता.मुदखेड येथील गट क्र. ४०५ फे.फा.नं.९१७ विनायक रामराव कुलकर्णी यांना जमीन वाटून दिली हे फेरफारमध्ये नमूद केले तर वाटणीपत्रकाची सत्यप्रत.

२) फेरफार करण्यास कोणता बाँड दिला, त्याची सत्यप्रत,

३) फेरफार करण्यास कोणता अर्ज दिला, त्याची सत्यप्रत,

४) फेरफार करण्यास आई, दोन भाऊ-दीपक,यशवंत दोन बहिणी यांची संमती घेतली असल्यास सत्यप्रत."

अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे विहित मुदतीत प्रतिसाद देऊन ग.क्र.४०५ फेर क्र. ९१७ ची नक्कल दिली आहे व उर्वरित ४ मुद्यांवर संचिका उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता येत नाही, असे कळविले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी संचिकेचा शोध घेण्याकरिता आयोगाकडे काही कालावधी मिळण्याची विनंती केली. ही विनंती आयोगातर्फे मान्य करण्यात येत असून सुनावणीची पुढील तारीख निश्चित करण्यात येत आहे. पुढील  सुनावणीच्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक माहितीसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. ०७.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिश: उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामराव हैबतराव कुलकर्णी (डोणगावकर), एल.बी.देशमुख यांचा वाडा, नरसिंह गल्ली, होळी, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी,तलाठी सजा डोणगाव,ता.मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,तहसील कार्यालय,मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जीवन शंकरराव कुर्तडीकर,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका निरीक्षक,<br>भूमी अभिलेख कार्यालय,नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय,नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जीवन शंकरराव कुर्तडीकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड - श्री. व्ही. बी. भालेराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,नांदेड - श्री. रा.ग.लाखाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०८.०३.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये त्यांच्या कुटुंबाच्या मालमत्तेबाबत एकूण सात मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी सहा मुद्यांची माहिती प्राप्त झाली आहे. मुद्दा क्र.६ ची माहिती प्राप्त झालेली नाही. मुद्दा क्र. ६ मध्ये - सन १९७७-७८ रोजी ज्या वेळेस प्रथम न.भु.क्र. चा सर्वे झाला होता, त्यावेळेस कुर्तडीकर कुटुंबियाची सामायिक मिळकत व वाटणी बाबत नगरपालिका, नांदेड यांनी दाखल केलेले दस्तावेज व वाटणीच्या नकाशाची प्रत माहिती मागितली आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, सीटीएस मधील नोंद सन १९७७ मध्ये झालेल्या सर्वेक्षणानंतर झाली, त्यावेळचा नकाशा त्यांच्याकडे उपलब्ध आहे. तथापि अपिलार्थी यांना अपेक्षित असलेला - नगर परिषदेकडे सादर करण्यात आलेला नकाशा जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखावर उपलब्ध नाही. तथापि त्यांच्याकडे आज उपलब्ध असलेला सन १९७७ सालाच्या सर्वेक्षणानंतरचा नकाशा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवलोकनास्तव सादर केला. सदर नकाशाची एक छायांकित प्रत त्वरित संदर्भासाठी आयोगाचे सूचनेनुसार अपिलार्थीस आज सुनावणी दरम्यान देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

वरील बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत नकाशाची प्रमाणित प्रत अपिलार्थीस देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती (नकाशाची प्रमाणित प्रत) अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. जीवन शंकरराव कुर्तडीकर,द्वारा ॲड. अनुप प्रशांत कुर्तडीकर, कुर्तडीकर वाडा, चिखलवाडी कॉर्नर, नांदेड - ४३१ ६०१-२

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमी अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बि.एस.यु.पी.),<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य),<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९४९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता (बि.एस.यु.पी.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ए.बी.कुलकर्णी, उपअभियंता, मनपा,नांदेड | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (सामान्य प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०३.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १०.०२.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये नांदेड महानगरपालिका हद्दीमध्ये जेएनएनयुआरएम किंवा इतर योजनेअंतर्गत बांधकाम झालेल्या घरकुल योजनेसंदर्भात विविध मुद्यांविषयी विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी १ जानेवारी, २००६ ते ९ फेब्रुवारी,२०१० असा आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ५ शी संबंधित माहिती कलम ७(१) नुसार दि. ०९.०३.२०१० रोजी विहित मुदतीत त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी पुढे असेही कथन केले की, संदर्भित विषयाची एकूण १३ डी.पी.आर. आहेत व एकूण २६,००० घरकूल आहे. ही माहिती विस्तृत असल्याकारणाने,ती माहिती देता येणे शक्य नाही. म्हणून पाहणी देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यासंदर्भातील पोच दिली आहे.

अपिलार्थीच्या माहिती अर्जावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी फार मोठया प्रमाणात व्यापक स्वरुपाची तीन वर्षे कालावधीची माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत.

वरील बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०२-०५-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवकांत कृष्णाथराव पुरमवार,रा.राघवेंद्र अपार्टमेंट, दयानंदनगर, व्ही.आय.पी.रोड,नांदेड - ४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बि.एस.यु.पी.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लंगेवाड वीरभद्र लालु, : अपिलार्थी
रा.मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगरपरिषद,मुखेड,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रंथपाल, नगर परिषद,मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. जी.व्ही.तुंगनवार,वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगरपरिषद, मुखेड, जि.नांदेड - श्री. एस.डी.बोथीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.०४.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०४.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०.०८.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि.१८.०३.२०१० रोजीच्या माहिती अर्जाद्वारे सिमेंट रोड व नाली बांधकामाबाबत - वॉर्ड क्र.१-वाल्मिकनगरमधील लंगेवाड यांच्या घरापासून ते गडमवाड यांचे घराकडे झालेली कामे - इ. माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन नोव्हेंबर २००५ ते फेब्रुवारी २०१० असा आहे. यामध्ये - कामाचे अंदाजपत्रक, काम सुरु केलेली तारीख व काम संपल्याची तारीख, कामाची पूर्तता झाल्याचे मोजमापपुस्तिकेची प्रत, पूर्ण झालेल्या कामाच्या खर्चाचा तपशील, पावत्यावगैरे खर्चाच्या रकमेचे दस्तावेज, साक्षांकित प्रती इ. माहितीचा समावेश आहे. अपिलार्थीस दि. २१.०५.२०१० रोजीच्या पत्राद्वारे एकूण २१ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यासंदर्भात दि. २४.०५.२०१० रोजी पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली आहे, असे मोघमपणे नमूद केले आहे. नेमके नमूद केलेले नाही.

या सर्व बाबी पाहता अपिलार्थीचे अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०२-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लंगेवाड विरभद्र लालू, लोखंडे चौक, वाल्मिकनगर,लातूर रोड,मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल, नगर परिषद,मुखेड,जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गोविंद धोंडोपंत पुराणिक, : अपिलार्थी
रा.कंधार,ता.कंधार,जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद,कंधार,ता.कंधार,जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद,कंधार,ता.कंधार,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक,नगर परिषद, कंधार,ता.कंधार,जि.नांदेड - श्री. भगवान भुजंगराव बनसोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद,कंधार,ता.कंधार,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.०५.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०८.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी लोकआयुक्त यांच्याकडे सुध्दा तक्रार केली आहे. त्यांना त्यांच्या मालमत्तेच्या हिश्श्यासंदर्भात नाव नोंदणी अपेक्षित होती. अशी नोंदणी आता झालेली आहे असेही त्यांनी पुढे त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास अवगत केले.

वरील बाबी जरी विचारात घेतल्या तरी अपिलार्थी यांनी दि.१२.०३.२०१० रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीस अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे आवश्यक आहे. यास्तव अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जात मागितलेल्या माहितीसंदर्भातील कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य पाठविण्यात याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, नगर परिषद, कंधार, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गोविंद धोंडोपंत पुराणिक, रा. नळगे गल्ली, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,नगर परिषद, कंधार, ता.कंधार, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद,कंधार,ता.कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. होनशेट्टे मारोतराव इरन्ना,<br>रा.चांडोळा, ता.मुखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,मुखेड,ता.मुखेड,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. होनशेट्टे मारोतराव इरन्ना | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रंथपाल, नगर परिषद, मुखेड, जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद, मुखेड,जि.नांदेड - श्री. एस.डी.बोथीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०९.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २९.०८.२००९ रोजीच्या अर्जान्वये मुखेड नगर परिषदेअंतर्गत वॉर्ड नं. ८ मधील आमदार कार्यालयापासून ते खाली गेलेल्या मस्जिदीमागील नवीन झालेल्या सी.सी.रोडच्या कामाबद्दल एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. ही माहिती त्यांना मिळालेली आहे. तथापि माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे अपिलार्थी यांनी युक्तिवादात कथन केले.तसेच त्यांना मिळालेल्या कागदपत्रांमध्ये रस्त्याच्या रुंदीची माहिती आवश्यक आहे. परंतु पुढे सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण झाल्यामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे, असेही त्यांनी आयोगास अवगत केले. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यासंदर्भात आयोगासमोर स्पष्टीकरण देऊ शकले नाही.

या सर्व बाबी पाहता, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी रस्त्यावर अतिक्रमण झाले असल्यास यासंदर्भात चौकशी करणे आयोगास आवश्यक वाटते.

या स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. होनशेट्टे मारोतराव इरन्ना, मु.पो.चांडोळा, ता.मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रंथपाल, नगर परिषद, मुखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख इमाम मौलासाब,<br>रा.बेरळी (खुर्द), ता.लोहा,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,लोहा,ता.लोहा,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद,लोहा,ता.लोहा,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०२-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद,लोहा,ता.लोहा,जि.नांदेड - श्री. खरात रामराव टिकाराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी,नगर परिषद, लोहा, ता.लोहा,जि.नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०५.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०६.२०१०<br>(फेरसादर दि. ०८.०७.२०१०) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.१०.०९.२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये स्वयंरोजगार योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना दिलेल्या कर्ज,प्रशिक्षणासंदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. १ एप्रिल, २००६ ते ०७ सप्टेंबर, २००९ असा आहे. त्यामुळे माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला आहे. तदनंतर दि. ०४.१२.२००९ रोजी माहिती दिलेली आहे. त्यापूर्वी माहिती संकलीत करण्यास कालावधी लागत आहे, ही बाब अपिलार्थीस दि. २३ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या स्वरुपाची माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. तथापि अपिलार्थीस एकूण २००० पृष्ठांची माहिती दि. ०४.१२.२००९ रोजी विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी त्यासंदर्भातील पोच दिलेली आहे. मुद्दा क्र. ४ ची माहिती अपिलार्थीस दि. ०१ मे, २०१२ रोजी दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीचे स्वरुप व कालावधी पाहता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील उपलब्ध माहिती व आतापर्यंत अपिलार्थीस देण्यात आलेली माहिती इत्यादी विचारात घेऊन अपिलार्थीचे अपील या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०२-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इमाम मौलासाब,रा.बेरळी (खुर्द), ता.लोहा,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कार्यालयीन निरीक्षक, नगर परिषद,लोहा, ता.लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, लोहा, ता.लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बिरकंगण मिलिंद रामचंद्र, : अपिलार्थी

भारिप बहुजन महासंघ, शहर अध्यक्ष,

सिध्दार्थनगर, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

नायब तहसीलदार (संगांयो), तहसील कार्यालय, देगलूर,
तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५४

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर,

तालुका देगलूर, जिल्हा नांदेड - श्री. पुरी जी. के.

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर,
जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये १९९८ ते मार्च २०१० पर्यंत राष्ट्रीय सामाजिक योजने अंतर्गत कुटूंब अर्थसहाय्यासाठी एकूण किती अर्ज प्राप्त झाले याबाबतची व इतर विषयावर एकूण सहा मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र त्यांच्या माहिती अर्जासोबत जोडले नसल्याकारणाने दिनांक १०-०६-२०१० रोजी अपिलार्थीस कागदपत्रांसाठी रुपये १४५३२ /- इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्याकडे दिनांक ०३-०८-२०१० रोजीच्या पत्रान्व्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी निधीची मागणी केली तसेच अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध आहे अपिलार्थीस कळविले आहे. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक २१-०१-२०११ रोजी स्मरणपत्रही दिले आहे व त्याची प्रत अपिलार्थीस दिली आहे. या बाबी आयोगापुढील कागदपत्रा-वरुन दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या छायांकीत प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही

आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बिरकंगण मिलिंद रामचंद्र, भारिप बहुजन महासंघ, शहर अध्यक्ष, सिध्दार्थ नगर, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. राधेशाम गंगाधरजी सोनी,<br>सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, नांदेड,<br>श्री. सदगुरुनिवास, ४९, राजेंद्रनगर, हौसिंग सोसायटी,<br>बाबानगर, उत्तर नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,<br>नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राधेशाम गंगाधरजी सोनी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त (अस्था), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड - श्री. संजय नारायणराव कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०७-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, "त्यांनी चौकशीच्या काळात लिहिले तारीखवार नोंदी (Proceeding Sheet) आणि श्री सायवाणीची (२५५) पानाची उत्तरपत्रिका सोडून Proceeding Sheet पान १ ते ८ आणि या संचिकेतील इतर पाने १ ते १८८ ची झेरॉक्स प्रती" ही माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दिनांक १५-०६-१९९९ ते १०-०३-२००० असा आहे. तथापि त्यांना अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अस्था), नांदेड वाघाळा शहर महानगर-पालिका, नांदेड यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, आज रोजी सर्व माहितीच्या झेरॉक्स प्रती त्यांनी सोबत आणलेल्या आहेत व ते त्या अपिलार्थीस देऊ शकतात. आयोगाने सूचित केल्यानुसार त्या (२०३ पृष्ठांची माहिती) अपिलार्थीस देण्यात आल्या. आज रोजी अपिलार्थीस माहिती दिली असल्यामुळे अपिलार्थी यांनी त्याची पाहणी करावी. त्याच-प्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण अभिलेखाची पाहणी दिनांक ०७ जून २०१२ रोजी सकाळी ११-०० ते सायंकाळी ०५-०० या कालावधीत राज्य माहिती आयोग औरंगाबाद खंडपीठाच्या कार्यालयात निश्चित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण अभिलेखे यावेळी सोबत आणावीत व त्याची अपिलार्थीस पाहणी द्यावी. सदरची संचिका अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. दिनांक ०७ जून २०१२ रोजी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीच्या संदर्भातील संपूर्ण अभिलेख्यांसह राज्य माहिती आयोग खडपीठ औरंगाबाद येथे उपस्थित राहावे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक ०७ जून २०१२ रोजी संपूर्ण अभिलेखे अपिलार्थीस दाखविण्याची कार्यवाही योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०१२**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राधेशाम गंगाधरजी सोनी, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी, नांदेड, श्री. सदगुरुनिवास, ४९, राजेंद्रनगर, हौसिंग सोसायटी, बाबानगर, उत्तर नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अस्था), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख कय्युम शेख नूर,<br>माजी नगरसेवक,<br>घर नंबर ७/३/३५८, फैयाज प्रेस समोर, साईनगर, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. शास्त्री किरण तुकाराम, उप अभियंता | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०९-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये नांदेड शहर मनपा हद्दीमध्ये हातपंप (हाप्सा) बोअर भरणे एकूण किती केले, टेंडरसाठी कोणत्या पेपरला जाहीरात दिली, शेड्युल बी व वर्क ऑर्डरची सत्यप्रत, अशी माहिती मागितली आहे. यामध्ये माहितीचा कालावधी दिलेला नाही. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. अपिलार्थी यांचे व्दितीय अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार विहीत मुदतीत दाखल झालेले नसून विलंबाने सादर झालेले आहे. विलंबाकरिता कोणतेही समर्थनीय कारण त्यांनी दिलेले नाही. तथापि विलंब क्षमापित करुन हे अपील सुनावणीकरिता घेण्यात आले आहे. अपिलार्थी यांना दिनांक ०२-०५-२०१२ रोजी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात शेड्युल बी अंदाजपत्रकाची एक प्रत, कामाची निविदा सूचनेची एक प्रत व कामाचे आदेश पोस्टाने पाठविल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख कय्युम शेख नूर, माजी नगरसेवक, घर नंबर ७/३/३५८, फैयाज प्रेस समोर, साईनगर, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे भिमरत्न दादाराव, : अपिलार्थी

रा. घर क्रमांक २८१, हनुमान मंदिर रोड, कैलासनगर,
नांदेड - ४३१ ६०५

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

अपर आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती
रोड, आर. टी. ओ. कार्यालयासमोर, नागपूर

जन अपिलीय अधिकारी तथा :

आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती रोड, आर. टी. ओ.
कार्यालयासमोर, नागपूर

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५७

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. कांबळे भिमरत्न दादाराव : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

सहायक प्रकल्प अधिकारी, कार्यालय अपर आयुक्त,
आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती रोड, आर. टी. ओ.
कार्यालयासमोर, नागपूर - श्री. वसंत मारोतराव जवळे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

उप आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती रोड,
आर. टी. ओ. कार्यालयासमोर, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०४-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०३-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १६-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०६-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये,

१. कनिष्ठ महा. शि. सेवक जाहिरात दिनांक २६-०९-२००८ निवड यादीची छायांकीत प्रत.

२. निवडलेल्या इंग्रजी विषयाचे कनि. महा. शि. सेवक यांच्या लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या छायांकीत प्रती.

३. निवडलेले इंग्रजी विषयाचे कनिष्ठ महा. शि. सेवक यांच्या मुलाखतीच्या गुणांच्या यादीची छायांकीत प्रती.

४. कांबळे भिमरत्न दादाराव (रोल नंब. JE २६२१) यांच्या लेखी परिक्षेची उत्तरपत्रिकेची छायांकीत प्रत व मुलाखतीच्या गुणांची छायांकीत प्रत, अशी माहिती मागितली आहे.

यापैकी मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. मुद्दा क्रमांक २ मध्ये अपिलार्थी लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती मागत आहेत. त्या माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (९) (ड.) नुसार देता येणार नाही असा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घेतला आहे. इतर विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (त्र) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही असे आयोगाचे मत आहे. तथापि मुद्दा क्रमांक ४ मध्ये अपिलार्थी यांनी त्यांच्या स्वतःच्या लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रिकेची प्रत व त्यांच्या मुलाखतीच्या गुणांची छायांकीत प्रत मागितली आहे. त्यापैकी अपिलार्थीस त्यांच्या मुलाखतीच्या गुणांची प्रत देण्यात आली आहे. लेखी उत्तरपत्रिकेची प्रत त्यांना देय होत असून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरुदीनुसार कलम १० नुसार सदर उत्तरपत्रिका तपासणी करणा-याचे नांव, पद फोन नंबर इत्यादी संदर्भ वगळून उत्तरपत्रिकेची प्रत देण्याची व्यवस्था करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे भिमरत्न दादाराव, रा. घर क्रमांक २८१, हनुमान मंदिर रोड, कैलासनगर, नांदेड - ४३१ ६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी, कार्यालय अपर आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती रोड, आर. टी. ओ. कार्यालयासमोर, नागपूर - ४४० ०१० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, आदिवासी विकास, गिरीपेठ, अमरावती रोड, आर. टी. ओ. कार्यालयासमोर, नागपूर - ४४० ०१० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सोनटक्के संभाजी लक्ष्मण, : अपिलार्थी
मु. पो. पाटोदा (बु.), तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद,<br>तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड - श्री. मंतावार व्ही. एच. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,<br>जिल्हा नांदेड - श्री. के. बी. जक्कल | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०९-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १५-०५-२०१० च्या माहिती अर्जान्वये प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्यामुळे अशा प्रकारची प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येत येत नसल्यामुळे देय होत नाही असे कळविले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितली असल्याने ती जन माहिती अधिकारी यांनी नाकारली आहे, असे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार ही बाब योग्य असल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनटक्के संभाजी लक्ष्मण, मु. पो. पाटोदा (बु.), तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, : अपिलार्थी

मुख्य संपादक, सा. प्रवक्ता, पत्रपेटी क्रमांक ५, मुख्य पोस्ट ऑफिस, नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली,

तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९५९

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

- श्री. आर. व्ही. बंगाळे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

- श्री. एन. बी. अंबुलगेकर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १९-०५-२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २५-०६-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे अभिलेखे अपिलार्थीस कार्यालयात दिनांक २५-०४-२०१० रोजी दाखविण्यात आले आहेत. अपिलार्थी यांनी ते पाहिले असून त्यांचे समाधान झाले आहे व याबाबतची पोच त्यांनी दिली आहे. या सर्व बाबी कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ विठ्ठलराव तलवारे, मुख्य संपादक, सा. प्रवक्ता, पत्रपेटी क्रमांक ५, मुख्य पोस्ट ऑफिस, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. म. खलीलोद्दीन म. जैनोद्दीन,<br>घर नंबर ९-६-४५६/१-२, रहेमत नगर, नुरे इलाही मस्जिद जवळ, नांदेड | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, भविष्यनिर्वाह निधी वेतन पथक (प्रा.), नांदेड | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, भविष्यनिर्वाह निधी वेतन पथक (प्रा.), नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एकलारे एस. आर., कनिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक  ०३-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म. खलीलोद्दीन म. जैनोद्दीन, घर नंबर ९-६-४५६/१-२, रहेमत नगर, नुरे इलाही मस्जिद जवळ, नांदेड.

२.	जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, भविष्यनिर्वाह निधी वेतन पथक (प्रा.), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोतीराम काशीराम पवार,<br>रा. फुलेनगर, पो. तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोतीराम काशीराम पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. व्हि. वारेबार, लिपीक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १२-०४-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २८-०५-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०५-०७-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली यांनी त्यांचे पत्र दिनांक ०२-०५-२०१२ अन्वये ते आजारी असल्यामुळे प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २७-०६-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोतीराम काशीराम पवार, रा. फुलेनगर, पो. तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पवळे बालाजी शंकर, : अपिलार्थी

मु. मरवाळी, पो. गडगा, तालुका नायगांव (खै.),

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.),

तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६२

२ सुनावणीची तारीख दि. ०३-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

अव्वल कारकून (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

- श्री. आर. एन. चौहान

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०४-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०५-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १४-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये, नायगांव (खै.) तालुक्यातील १०६ स्वस्त धान्य दुकानांबाबतची वाटप रजिस्टर, स्टॉक रजिस्टर, परमीट, पावतीबुक व योजनानिहाय लाभार्थीची यादी इत्यादी माहिती अभिलेखाच्या प्रतिसह मागितलेली आहे,असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये नमूद केल्याचे दिसून येत आहे.तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जामध्ये २५ दुकानांचाच उल्लेख आहे. अपिलार्थीच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना दिनांक २५-०४-२०१० रोजी लेखी पत्र देऊन माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत सूचित केले आहे. यापैकी ३ स्वस्त धान्य दुकानांची माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीचा अर्ज विचारात घेता अपिलार्थीने फार मोठ्या कालावधीची व विविध मुद्दयांवर विस्तृत अशी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते ,असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही, असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पवळे बालाजी शंकर, मु. मरवाळी, पो. गडगा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (पुरवठा), तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. महमद अकबर म. नवाज,<br>माजी मु. अ.,<br>घर नंबर ५-१-२६५, नगर गल्ली, नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एकलारे एस. आर., लिपीक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०८-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०८-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. महमद अकबर म. नवाज, माजी मु. अ., घर नंबर ५-१-२६५, नगर गल्ली, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जयराम पोचीराम वने,<br>रा. राजवाडी, पो. मेंडका, ता. मुदखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,मुदखेड,जि.नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>मुदखेड,जि.नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषि अधिकारी,मुदखेड,जि.नांदेड - श्री. शिवाजी नारायणराव चौकले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, मुदखेड,जि.नांदेड - श्री. अनंत अर्जुनराव करपुडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २२.०६.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये मुदखेड तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीबाबत दि. १ एप्रिल, २००५ ते २० जून, २०१० या कालावधीत झालेल्या कामाची माहिती मागितली आहे.अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते. मागितलेल्या माहितीची व्याप्ती जास्त असल्याकारणाने संकलीत करण्यास वेळ लागला. एकूण ८२३० पृष्ठांची ५ वर्षांची माहिती अपिलार्थीस दि. २२.०३.२०११ रोजी दिलेली आहे. अपिलार्थी यांनी पोच दिली आहे. या माहितीमध्ये सन २००५-०६ ते २००९-१० या कालावधीत प्रतिवर्षी अनुक्रमे १७३४, ११७५,१४४६,१६३० व २५४५ इ. पृष्ठांच्या माहितीचा समावेश आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत. अपिलार्थी यांनी विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. ही बाब माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार अभिप्रेत नाही. अशा वेळी जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार माहितीची पाहणी देणे योग्य ठरते, ही बाब जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी भविष्यात लक्षात ठेवावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयराम पोचीराम वने, मु. राजवाडी, पो.मेंडका, ता.मुदखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,ता. मुदखेड, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मिराशे शंकरराव किशनराव, : अपिलार्थी
रा. तालंग, ता.हदगाव, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग),
जिल्हा परिषद, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तालंग,ता.हदगाव,जि.नांदेड - श्री. सी.के. कंदप | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव,जि.नांदेड - श्री. व्ही. आर. हरकल | : | उपस्थित |
| ३.४ | श्री. एन.ए.कुरेशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद, नांदेड | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.),जिल्हा परिषद, नांदेड उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.०५.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये ग्रामपंचायत तालंग येथे सन २००१ ते २०१० या कालावधीतील विविध योजनेतून केलेल्या कामासंदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. त्या माहितीमध्ये - या कालावधीत कोणकोणत्या योजना आल्या, त्या योजनेचे काम पूर्ण झाले का अर्धवट आहे, १२ वा वित्त आयोग, इंदिरा आवास योजना, दलित वस्तीसुधार योजना व इतर योजनेतून आलेला निधी, विशेष घटक, जवाहर विहिर योजनेतून झालेली कामे - या मुद्यांचा समावेश आहे. माहिती संकलीत करण्यास कालावधी लागला. तदनंतर दि. २०.०७.२०१० रोजी माहिती दिलेली आहे. त्यासंदर्भातील पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे.

प्रसंगावशात आयोगापुढील युक्तिवादात सादर करण्यात आले की, अपिलार्थी यांनी आतापर्यंत साधारणतः १५-२० अर्ज केलेले आहेत व माहिती अर्जान्वये ते सतत माहिती मागत असतात. याबाबीची नोंद आयोगाने घ्यावी, अशी विनंती केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शंकर किशनराव मिराशे, मु.पो. तालंग, ता.हदगाव, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तालंग,ता.हदगाव,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगाव, जि.

नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. पांडुरंग शिवनराव सिरसाट,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा परिषद (पंचायत विभाग),नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड - श्री. एन.ए.कुरेशी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १५.०६.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये दि. ०२.०६.२०१० रोजी प्रसिध्द केलेल्या कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या निवडीबाबत माहिती मागितली आहे.

सदरची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे त्याच दिवशी दि. १५.०६.२०१० रोजी कळविण्यात आले आहे. तथापि त्यांनी कागदपत्रांची मागणी केल्यामुळे दि. २२.०६.२०१० रोजी संपूर्ण कागदपत्रे देण्यात आली आहेत.आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांमध्ये अपिलार्थीस दिनांक २२.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यासंदर्भातील पोच अपिलार्थी यांनी स्थळप्रतीवर दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पांडुरंग शिवनराव सिरसाट, एन.डी.४२, जे-१,१७१५, हडको, नवीन नांदेड-४३१ ६०३.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) कार्यालय, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हर्षल पि.शरदचंद्र जैन, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विवाह नोंदणी निबंधक,
ग्रामपंचायत, मालेगाव,ता.मालेगाव,जि.वाशिम

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मालेगाव, जि.वाशिम

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. हर्षल पि.शरदचंद्र जैन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, मालेगाव, जि.वाशिम - श्री. ए.जे. नवघरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, जि.वाशिम - श्री. एस.टी.पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०८.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१०.२०१० (अमरावती खंडपीठाकडे प्राप्त)<br>२१.१०.२०१० (औ.बाद खंडपीठाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १२.०७.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये माहे जानेवारी, २००९ मधील नोंदणी झालेल्या विवाहाची माहिती मिळणेबाबत संपूर्ण विवाह झालेल्या नोंदणीची यादी अशी माहिती मागितली आहे.

सदरची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, मालेगाव, जि.वाशिम यांनी दि. ३०.०९.२०१० रोजीच्या पत्राद्वारे दिलेली आहे. अपिलार्थी यांनी दि. १५.१०.२०१० रोजी पोच दिली आहे. उपलब्ध कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हर्षल शरदचंद्र जैन, सन्मती कलामंदिर एरिया, सोमेश कॉलनी, नांदेड - ४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, मालेगाव, जि.वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगाव, जि.वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मुकुंद कचरु परचंडेकर,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>अधिष्ठाता यांचे कार्यालय,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>अधिष्ठाता यांचे कार्यालय,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | ०६.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २९.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

दोनही बाजूंना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्याकरिता आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी. पुढील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २७.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मुकुंद कचरु परचंडेकर, घर क्र. १-१२-१२१, "सरस्वती कुंज", शाहुनगर, नांदेड-४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी, अधिष्ठाता यांचे कार्यालय,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊराव मरीबा भदरगे,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (बि.एस.यु.पी.),<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग),<br>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भाऊराव मरीबा भदरगे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यकारी अभियंता (बि.एस.यु.पी.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही. एम. स्वामी, उपअभियंता,बि.एस.यु.पी.झोन क्र.१ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त (बि.एस.यु.पी.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड - श्री. संतोष कवडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.०७.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०८.२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७.१०.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये बी.एस.यु.पी.योजनेंतर्गत आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चर बांधकाम व आर.सी.सी.डिझाईनबाबत माहिती मागितली आहे. तसेच त्यासंदर्भातील आकडेवारी, जयभीमनगर येथील सार्वजनिक शौचालय इ.बाबत माहिती मागितली आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळालेली आहे. तथापि त्यांना आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चरमधील स्टीलचे ड्रॉईंगची प्रत मिळाली नाही, असे त्यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले. सदर आर.सी.सी.स्टीलचे ड्रॉईंगची प्रत आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीकडे उपलब्ध आहे. सदर माहितीची एक छायांकित प्रत आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

या पार्श्वभूमीवर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भदरगे भाऊराव मरिबा,रा. जयभिमनगर, पो. शिवाजीनगर, नांदेड- ४३१ ६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बि.एस.यु.पी.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (बि.एस.यु.पी.), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. पिराजी सायन्ना येरमुलवार, : अपिलार्थी
रा.कुंडलवाडी, ता. बिलोली, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद कुंडलवाडी, ता.बिलोली,
जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कुंडलवाडी, ता.बिलोली,
जि.नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. पिराजी सायन्ना येरमुलवार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०७.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०३.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांनी खरेदी केलेल्या घरासंदर्भात आहे, असे त्यांनी युक्तिवादाद्वारे आयोगासमोर कथन केले. त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या संपूर्ण माहितीचा एक संच घेऊन पुढील सुनावणीस जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित राहावे, यासाठी सुनावणीची पुढील तारीख दि. २६.०६.२०१२ अशी निश्चित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तसेच कार्यालय प्रमुख या नात्याने जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगर परिषद, कुंडलवाडी,ता.बिलोली, जि.नांदेड यांची पुढील सुनावणीस कलम 19(8)(a) व 19(7) नुसार उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २६.०६.२०१२ रोजी दुपारी ०३.३० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. पिराजी सायन्ना येरमुलवार,रा.कुंडलवाडी, ता. बिलोली, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, नगर परिषद कुंडलवाडी, ता.बिलोली,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कुंडलवाडी, ता.बिलोली, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बेंद्रे अरुण तातेराव व श्री. कदम ज्ञानोबा संभाजी, रा. सावरगाव(न.), ता.लोहा, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बेंद्रे अरुण तातेराव व श्री. कदम ज्ञानोबा संभाजी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. वि. ना. जोशी, अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०५.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.०७.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. २,३ व ४ ची माहिती देय होत आहे. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. १ द्वारे विशिष्ट तक्त्यामध्ये माहिती मागितली आहे.अशी माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही.

दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ३०.०३.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये जून, ९८ पासून सहशिक्षकांची मान्यता व प्रवर्गाबाबतची माहिती मागितली आहे. यामध्ये तक्त्यामधील माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मध्ये बसत नाही. उर्वरित माहिती मिळाली असल्याचे अपिलार्थी यांनी नमूद केले आहे. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ची माहिती मिळाली नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी या माहितीच्या प्रती दि. ०७.०६.२०१० रोजीच्या पत्राद्वारे पाठविल्याचे कथन केले. त्याची एक प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, ती आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांना शिवनिकेतन हायस्कूल, सावरगाव (न.), ता. लोहा, जि.नांदेड (जून, ९८ पासून आजपर्यंत) या शाळेतील सर्व सहशिक्षकांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतींची आवश्यकता आहे.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.नांदेड यांनी संबंधित शाळेकडून विशेष बाब म्हणून वरील माहिती संकलीत करुन अपिलार्थीस देण्याची व्यवस्था करावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०३-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बेंद्रे अरुण तातेराव व श्री. कदम ज्ञानोबा संभाजी,रा. सावरगाव(न.), ता.लोहा, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भिमराव सैनाजी सगर, : अपिलार्थी
रा. गोजेगाव, ता. मुखेड, जि.नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २९.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. २९.०६.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये कलाकार मानधनाबाबत माहिती मागितली आहे. तसेच अपिलार्थी यांना सन २००७-०८ या कालावधीमध्ये मानधन मंजूर झाले, तरी केव्हापासून सुरु झाले, अशी माहिती मागितली आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे आढळून येत नाही. ही बाब विचारात घेता अपिलार्थीस आजपावेतो माहिती का देण्यात आली नाही, याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास खुलासा सादर करावा व अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती त्यांना नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, मुखेड यांनी गट विकास अधिकारी,पंचायत समिती, मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांच्यामार्फत आयोगास खुलासा सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०३-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भिमराव सैनाजी सगर,रा. गोजेगाव, ता. मुखेड, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सिध्देश्वर नागनाथ स्वामी,<br>रा. जंगमवाडी, पो.मालेगाव,<br>ता.अर्धापुर, जि.नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपकार्यकारी अभियंता,<br>बांधकाम उपविभाग,<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०३-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, बांधकाम उपविभाग,जिल्हा परिषद, नांदेड- श्री. वहाबुद्दिन फारुकी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, नांदेड - श्री. एम. बी.बंगाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १७.०७.२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ३०.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २३.०९.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५.१०.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे त्यातील पहिल्या मुद्यामध्ये ग.नं. २०२ मौजे मालेगाव येथील जिल्हा परिषद निधीतून बांधलेल्या पूलाबाबत व राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ औरंगाबाद यांनी दि. २६.०२.२००८ रोजी दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीबाबत माहिती मागितली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात त्यावेळी सद्यपरिस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी पाठविणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जास तीस दिवसांच्या आत प्रतिसाद देण्याची दक्षता घ्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील पहिल्या मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी कथन केले. तरी मुद्दा क्र. २ मधील माहितीची सद्यपरिस्थिती उपलब्ध कागदपत्रांवरुन तात्काळ पुरविण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,बांधकाम उपविभाग,जिल्हा परिषद, नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ संदर्भातील माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०३-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्देश्वर नागनाथ स्वामी,रा. जंगमवाडी, पो.मालेगाव,ता.अर्धापुर, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,बांधकाम उपविभाग,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. स. वजीर स. अहमद, : अपिलार्थी
रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,<br>तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३-०९-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १४-१०-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांच्या दिनांक १२-१०-२०१० च्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जय भारत मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह, अर्धापूर या होस्टेलमधील विद्यार्थ्यांची जून २००९ ते जून २०१० या कालावधीतील नावागावासहीत यादी मागितली आहे. माहिती अपिलार्थीस मिळालेली आहे. तसेच अपिलार्थी यांच्याकडून माहितीच्या छायांकीत प्रतीकरिता व नोंदणीकृत टपालाच्या खर्चापोटी रुपये ३६ इतके घेण्यात आले आहेत तथापि त्यांना ११ रुपयांची माहिती देण्यात आली असून ५ रुपये पोस्टाचे तिकिट लावून सदर माहिती पाठविण्यात आली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना माहिती पाठविण्याकरिता १६ रुपये खर्च आला आहे. तरी उर्वरित रक्कम त्यांना परत मिळावी.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती पाठविण्यापोटी दिनांक २८-०७-२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी स्टेशनरीवरील खर्च व टपाल खर्च भरणा करावा असे कळविले आहे. सदर भरणा अपिलार्थी यांनी केलेला आहे. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर यांच्या दिनांक २३-०९-२०१० च्या पत्रावरुन माहिती पाठविण्यापोटी एकूण ३७ रुपये खर्च अपेक्षित आहे असे अपिलार्थीस कळविल्याचे दिसून येत आहे. प्रतिपृष्ठ रुपये दोन प्रमाणे येणारा खर्च व पोस्टाचा खर्च इतका अपिलार्थीस त्यांनी कळविणे अपेक्षित आहे. या प्रकरणात रुपये वीस इतके जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून जास्तीचे घेतल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी उर्वरीत रुपये वीस इतके अपिलार्थीस परत करावेत, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड हे अपिलार्थीस रुपये वीस इतकी रक्कम परत करतील ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांनी पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स. वजीर स. अहमद, रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद माध्यमिक हायस्कूल, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एस. पी. गायकवाड, : अपिलार्थी

भिमघाट, मील एरीया, एन. टी. सी. सब स्टेशन जवळ,
मिल कॉर्नर, नांदेड - ४३१ ६०१

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग,
वसमतनगर, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :

कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७५

२ सुनावणीची तारीख दि. ३०-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

उप कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग,
वसमतनगर, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली
- श्री. एस. एस. लाढकर

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित

कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर,
तालुका वसमत, जिल्हा हिंगोली - श्री. मो. जमिल

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०६-०७-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. २१-०८-२०१०

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २०-०९-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०७-२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक १३-०८-२०१० व दिनांक २६-०८-२०१० रोजी देण्यात आली आहे. ही बाब आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी व्दितीय अपिलामध्ये त्यांना माहिती अपूर्ण व चुकीची मिळाली आहे ही बाब मोघमपणे नमूद केलेली आहे, नेमकी नमूद केलेली नाही. ही बाब विचारात घेता अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस. पी. गायकवाड, भिमघाट, मील एरीया, एन. टी. सी. सब स्टेशन जवळ, मिल कॉर्नर, नांदेड - ४३१ ६०१.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमत नगर, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे विभाग, वसमतनगर, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. कांबळे धम्मपाल भानुदास, : अपिलार्थी
मु. पो. डोंगरगाव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड - ४३१ ७०८

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
श्री. संत मोतीराम महाराज हायस्कुल, कारेगांव,
तालुका लोहा, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. संत मोतीराम महाराज हायस्कुल,<br>कारेगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०-१२-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी दिनांक २७-८-२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत मोतीराम महाराज हायस्कुल, कारेगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना कळविले आहे की, अपिलार्थीस माहिती १५ दिवसाच्या आत देण्यात यावी. ही बाब विचारात घेता सदरची माहिती दिली नसल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत मोतीराम महाराज हायस्कुल, कारेगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड हे अपिलार्थीस माहिती देतील ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना पहावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत मोतीराम महाराज हायस्कुल, कारेगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड हे वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती पाठवतील ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी पहावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे धम्मपाल भानुदास, मु. पो. डोंगरगाव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड - ४३१ ७०८.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. संत मोतीराम महाराज हायस्कुल, कारेगांव, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किशन मष्णाजी म्हैत्री,<br>काळजीवाहक, श्री. संत ज्ञानेश्वर मतिमंद विद्यालय,<br>मौजे हानेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. संत ज्ञानेश्वर मतिमंद विद्यालय,<br>मौजे हानेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. किशन मष्णाजी म्हैत्री | : | उपस्थित |
| ३.२ | मदतनीस - श्री. विशाल आनंदराव कवठेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. संत ज्ञानेश्वर मतिमंद विद्यालय, मौजे हानेगांव, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड<br>- श्री. बिरादार डी. टी. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १०-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गडपाळे चंद्रकांत निवृत्ती, : अपिलार्थी
रा. रेल्वे स्टेशन, करखेली, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड
- ४३१ ८०९

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, कृषि कार्यालय, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९९१

२ सुनावणीची तारीख दि. ३०-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी,
धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड
- श्री. नाईक माधवराव गोविंदराव

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड - श्री. घुमनवाड अरुण ग्यानोबाराव

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. २३-०७-२०१०

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये धर्माबाद तालुक्यातील सन २०१० मधील शेततळ्याबाबत विविध माहिती जसे, किती शेतक-यांचे अर्ज आले, किती शेतक-यांनी शेततळे केले व प्रत्येक शेतक-याच्या मापन पुस्तिकेची सत्यप्रत, त्याचप्रमाणे चिंचोली येथील शेततळ्या-बाबत, कृषि दिंडी इत्यादी विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदर माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेणार होते. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी आहे जी माहिती देणे शक्य होते ती अपिलार्थीस दिनांक १०-०८-२०१० रोजी व दिनांक १८-१०-२०१० रोजी दिलेली आहे व उर्वरीत माहिती कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध ठेवण्यात आलेली आहे. या बाबी आयोगा-पुढील कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी उर्वरीत माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी. पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील वर नमूद केल्याप्रमाणे उर्वरीत अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०५-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गडपाळे चंद्रकांत निवृत्ती, रा. रेल्वे स्टेशन, करखेली, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड - ४३१ ८०९.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गंगाधर दिगंबर बडुरे, : अपिलार्थी
मु. पो. बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९९२

२ सुनावणीची तारीख दि. ३०-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड
- श्री. आर. व्ही. बंगाळे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
तालुका कृषि अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड - श्री. एन. बी. अंबुलगेकर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-१२-२००८

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २०-०१-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१-०४-२००९ फेरसादर दिनांक ०१-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११-१२-२००८ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक २०-०५-२००९ रोजी देण्यात आलेली आहे व याबाबतची पोच दिनांक २०-०५-२००९ रोजी अपिलार्थी यांनी तालुका कृषि अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना दिलेली आहे. कागदपत्रावरुन ही बाब दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३०-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गंगाधर दिगंबर बडुरे, मु. पो. बरबडा, तालुका नायगांव (खै.), जिल्हा नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. होनशेट्टे लक्ष्मण मारोतराव,<br>मु. पो. चांडोळा, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड - ४३१ ७१५ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१९९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३०-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. होनशेट्टे लक्ष्मण मारोतराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अव्वल कारकून (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ - श्री. साखरे खुशालराव बाबाराव | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०५-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१-०७-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-१०-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्रयस्थ उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी त्रयस्थ श्री. साखरे यांच्या संदर्भात विविध माहिती मागितली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही त्यामुळे देता येत नाही असे त्यांना कळविण्यात आले व माहितीचा अर्ज मंत्रालयाकडे पाठविण्यात आला. त्यांच्याकडेही त्रयस्थाची माहिती उपलब्ध नाही असे सांगण्यात आले. दरम्यानच्या काळात जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविल्यानुसार त्रयस्थ यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आज रोजी त्रयस्थ उपस्थित आहेत. त्यांनी कथन केले की, त्यांनी त्यांच्याकडील कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयास दिलेली आहे व जिल्हाधिकारी कार्यालयाने ती अपिलार्थीस दिली. यापूर्वीही त्यांनी वेळोवेळी अपिलार्थीस माहिती दिली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व कलम ११ नुसार त्रयस्थास याबाबत त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक होते व त्यांची बाजू ऐकून घेतल्यानंतर व्यापक जनहिताच्या कसोटीवर माहिती देणे योग्य ठरत असल्यास तसा निर्णय घेणे आवश्यक होते तथापि त्यांनी तसे केल्याचे आढळून येत नाही. त्याचप्रमाणे त्रयस्थाकडे माहितीची मागणी करुन ती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये बसत नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देणे व उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपिलार्थीस कळविणे अभिप्रेत आहे. या सर्व बाबी जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांना लक्षात ठेवाव्या लागतील. जी माहिती उपलब्ध झाली आहे ती अपिलार्थीस देण्यात आली आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता प्रकरण या टप्प्यावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३०-०५-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. होनशेट्टे लक्ष्मण मारोतराव, मु. पो. चांडोळा, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड - ४३१ ७१५.

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून (स्वातंत्र्य सैनिक कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजय एम. कदम, : अपिलार्थी

फ्लॅट नं. ७, देवगिरी शितल अपार्टमेंट, बाळासाहेब पवार नगर, हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

जन अपिलीय अधिकारी, :

तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-१०-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २६-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११-०१-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २१-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १७-१२-२०११ च्या पत्रान्वये विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरु असल्याने प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली होती. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २६-११-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्र्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-११-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजय एम. कदम, फ्लॅट नं. ७, देवगिरी शितल अपार्टमेंट, बाळासाहेब पवार नगर, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पो. बॉ. १९६७, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सबीर हुसेन एफ. अत्तार, : अपिलार्थी
२७ बी, एन-१२, प्रोफेसर कॉलनी, हिमायत बागेसमोर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०२६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०२-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०५-०१-२०१२ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित

होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ३०-११-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-११-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सबीर हुसेन एफ. अत्तार, २७ बी, एन-१२, प्रोफेसर कॉलनी, हिमायत बागेसमोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख इकबाल शेख हबीब, : अपीलकर्ता
सादत नगर, गल्ली नं. ६, पैठण रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३७६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>औरंगाबाद | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक ११-१०-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. राज्य सरकारी कर्मचा-यांच्या राज्य संपामुळे अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयातील संबंधित कर्मचारी संपावर गेले असून सदरील प्रकरणातील संचिका त्यांच्या ताब्यात असल्यामुळे प्रकरणात मूळ संचिका उपलब्ध नसल्यामुळे आज रोजी सुनावणीस उपस्थित राहता येत नाही तरी कृपया पुढील तारीख देण्यात यावी अशी विनंती अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी आयोगास केली होती. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या प्रकरणाची सुनावणी आता दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार या सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इकबाल शेख हबीब, सादत नगर, गल्ली नं. ६, पैठण रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख इलियास, : अपीलकर्ता
माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कॅन्टोनमेंट,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३७७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २२-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०२-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक २१-०४-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक ११-१०-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु सदर सुनावणीसही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी पुढील तारीख देण्यात येऊन ही सुनावणी आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख इलियास, माहिती सेवा समिती, दक्षता अधिकारी, छावणी कँन्टोनमेंट, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र गंगाधर उगले, : अपिलार्थी

मु. पो. कांताई निवास, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०४-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी

उपस्थित होते. त्यांनी प्रकरणात सद्यस्थिती आयोगास अवगत करुन देण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. त्यांची ही विनंती मान्य करण्यात येऊन त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १२-१०-२०१२ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. त्यावेळी दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणीसाठी पुढील तारीख देण्यात येऊन ती आज ठेवण्यात आली होती.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) अन्वये आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये अपर आयुक्त, (नगरपालिका प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त, (नगरपालिका प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजेंद्र गंगाधर उगले, मु. पो. कांताई निवास, यशवंतनगर, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, नगर परिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त, (नगरपालिका प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी. एम. पठाण, : अपिलार्थी
प्लॉट नं. ७१, महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी,
जटवाडा रोड, हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यालय सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग),
पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल
कंपाऊंड, पुणे रेल्वे स्टेशन समोर, पुणे - ०१

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे,
विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे - ०६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४६० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग),<br>पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल<br>कंपाऊंड, पुणे रेल्वे स्टेशन समोर, पुणे - ०१ | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे,<br>विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे - ०६ | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०-०१-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०४-२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०४-०५-२०११ रोजी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्याने त्यावेळी प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक १२-१०-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळीही अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटल्याने त्यावेळी सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित राहतील ही बाब पहावी असे अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा, मंत्रालय, मुंबई यांनी पहावी असे त्यांना कळविण्यात आले होते. तरीही कोणीही उपस्थित नाही, याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) नुसार आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये आयोग सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे यांना या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करीत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर नव्याने सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बी. एम. पठाण, प्लॉट नं. ७१, महात्मा ज्योतिबा फुले हौसिंग सोसायटी, जटवाडा रोड, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, कुटूंब कल्याण भुवन आवार, नायडु हॉस्पिटल कंपाऊंड, पुणे रेल्वे स्टेशन समोर, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग/क्षयरोग), पुणे, विश्रांतवाडी, येरवाडा मेन्टल हॉ. कार्नर, पुणे - ०६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती वैशाली सुहास बिराजदार, : अपिलार्थी
१८, आशानगर, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
निवासी अभियंता, स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती वैशाली सुहास बिराजदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>निवासी अभियंता, स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४-०६-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०७-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २७-०९-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २५-११-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांना मागितलेली माहिती अद्यापपर्यंत मिळालेली नाही असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू अवगत होऊ शकली नाही. त्यांना बाजू मांडण्याकरिता त्यांना संधी देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. या सुनावणीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) अन्वये आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे. त्यांनी आवश्यक त्या सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती वैशाली सुहास बिराजदार, १८, आशानगर, नंदनवन कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी अभियंता, स्थावर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील,<br>केशवरजनी, एन-११, एच सेक्टर, प्लॉट नं. ०५, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद - ४३१ ००१ | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर विभाग १, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर विभाग १, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | प्रतिनिधी ॲव्होकेट श्री. शिवाजी माढेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर विभाग १, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर विभाग १, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०९-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०२-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०-०४-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०८-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांचे प्रतिनिधी ॲव्होकेट श्री. शिवाजी माढेकर हे उपस्थित आहेत. त्यांनी सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>अंतरिम आदेश</u>

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बिपीनचंद्र केशवराव पाटील, केशवरजनी, एन-११, एच सेक्टर, प्लॉट नं. ०५, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद - ४३१ ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर विभाग १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित शहर विभाग १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक, गुजराती विद्यामंदिर, खाराकुआ, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| २ | मुख्याध्यापक, गुजराती कन्या शाळा, खाराकुआ, औरंगाबाद | | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | मुख्याध्यापक, गुजराती विद्यामंदिर, खाराकुआ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.२ | मुख्याध्यापक, गुजराती कन्या शाळा, खाराकुआ, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | प्रतिनिधी - ॲड योगेश का. कानडे | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. जी. एस. सुसर, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| १ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०४-२०१० |
| २ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०५-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०८-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस संबंधित अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित अपिलार्थी यांच्या वतीने ॲडव्होकेट श्री. योगेश का. कानडे व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, गुजराती विद्यामंदिर, खाराकुआ, औरंगाबाद व गुजराती कन्या शाळा, खाराकुआ, औरंगाबाद या दोन अल्पसंख्याक भाषिक शाळा आहेत. या शाळांमध्ये किती अल्पसंख्यांक विद्यार्थी व शिक्षक घेतले जातात याबद्दल व इतर माहिती मूळ अर्जदार यांनी विचारली आहे. परंतु या शाळांमध्ये किती अल्पसंख्यांक शिक्षक व विद्यार्थी घ्यावेत याबाबत कुठलेही नियम नाहीत. अपिलार्थीचा दिनांक ११-०१-२०१० रोजीचा माहिती अर्ज दोन शाळेच्या मुख्याध्यापकांकडे वर्ग करण्यात आला आहे.

अपिलार्थी यांच्या वकिलाने युक्तिवादात कथन केले की, मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती शाळेकडे उपलब्ध नाही व ही माहिती अपिलार्थीने शाळा सुरु झाल्यापासून म्हणजे तीस वर्षापेक्षा जास्त कालावधीची मागितली आहे. माहितीचा कालावधी पाहता ती देणे शक्य होत नाही. तसेच मुद्दा क्रमांक ३ मध्ये त्रयस्थ शिक्षिका चेतना पाटील यांच्या बी. एड प्रमाणपत्राची प्रत मागितली आहे परंतु ही माहिती त्रयस्थाची वैयक्तीक माहिती असल्याने व त्रयस्थ यांनी सदर माहिती अपिलार्थीस देण्यात येऊ नये, असे निवेदन दिल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्यात आली नाही.

आयोगापुढे केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध नाही. माहितीचा कालावधी फार मोठा आहे. अशा प्रकारे माहिती मागितल्याने ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत.

मुख्याध्यापक तसेच उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती उपलब्ध नाही. मुद्दा क्रमांक २ बाबत अपिलार्थी यांनी शिक्षिका चेतना पाटील यांचे बी. एड च्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत मागितली आहे. त्रयस्थाची माहिती मागितली असल्यामुळे याबाबत त्यांना विचारण्यात आले तेव्हा त्यांनी माहिती देऊ नये असे कळविल्यामुळे ती माहिती देण्यात आली नाही. बी. एड च्या प्रमाणपत्रामुळे त्यांना नियुक्ती

मिळाली असल्यामुळे त्यात जनहित आहे त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे, असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गुजराती विद्यामंदिर, खाराकुआ, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक २ ची माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. मुख्याध्यापक, गुजराती विद्यामंदिर, खाराकुआ, औरंगाबाद.

२. मुख्याध्यापक, गुजराती कन्या शाळा, खाराकुआ, औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. म. स. राख, : अपिलार्थी

व्दारा, जी. एन. घुगे, प्लॉट नं. जी-८, सिडको, एन-४,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पाँईट, तिसरा मजला, सिनेप्लनेट समोर, सायन सर्कल जवळ, रोड नंबर ८, सायन, मुंबई - ४०० ०२२

जन अपिलीय अधिकारी तथा :

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पाँईट, तिसरा मजला, सिनेप्लनेट समोर, सायन सर्कल जवळ, रोड नंबर ८, सायन, मुंबई - ४०० ०२२

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८३

२ सुनावणीची तारीख दि. ३१-०५-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. म. स. राख : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी, : अनुपस्थित

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पाँईट, तिसरा मजला, सिनेप्लनेट समोर, सायन सर्कल जवळ, रोड नंबर ८, सायन, मुंबई - ४०० ०२२

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पाँईट, तिसरा मजला, सिनेप्लनेट समोर, सायन सर्कल जवळ, रोड नंबर ८, सायन, मुंबई - ४०० ०२२

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०५-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८-०४-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१-०५-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०८-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये म. प्र. नि. मंडळातील आस्थापनेवरील बिंदु नामावलीबाबत माहिती मागितली आहे. त्यांना माहिती मिळाली नाही असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. म. प्र. नि. आस्थापनेवरील वैज्ञानिक व तांत्रिक वर्ग १ व २ च्या अधिका-यांच्या बिंदु नामावली नोंदवहीची प्रत.

२. म. प्र. नि. आस्थापनेवरील वैज्ञानिक वर्ग १ व २ अधिका-यांच्या बिंदु नामावलीप्रमाणे तपासणी केली असल्यास त्याबाबतची छायांकीत प्रत.

३. वैज्ञानिक व तांत्रिक या संवर्गातील वर्ग १ व २ अधिका-यांच्या बिंदु नामावलीस सामान्य प्रशासन विभाग (मावक) यांच्याकडून मान्यता घेण्यात आली असल्यास त्याची प्रत.

४. खुल्या प्रवर्गातील व आरक्षण कायदा २००४ नुसार मागास प्रवर्गाच्या जागावर बिंदु नामावलीप्रमाणे पदोन्नती अथवा नियुक्ती करण्यात आली असल्यास याबाबतच्या आदेशाच्या प्रती.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे.अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित आहे असे आयोगाचे मत आहे. याकरिता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) अन्वये आयोगास प्राप्त अधिकारानुसार जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती देतील ही बाब पाहण्याची जबाबदारी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी माहितीच्या प्रती अपिलार्थीस देण्याची आणि अशा प्रकारची माहिती उपलब्ध नसल्यास तसे अपिलार्थीस स्पष्टपणे कळविण्याची व्यवस्था करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी जन माहिती अधिकारी हे वर नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पाठवतील, याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. म. स. राख, व्दारा, जी. एन. घुगे, प्लॉट नं. जी-८, सिडको, एन-४, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईट, तिसरा मजला, सिनेप्लनेट समोर, सायन सर्कल जवळ, रोड नंबर ८, सायन, मुंबई - ४०० ०२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), कल्पतरु पॉईट, तिसरा मजला, सिनेप्लनेट समोर, सायन सर्कल जवळ, रोड नंबर ८, सायन, मुंबई - ४०० ०२२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अब्दुल ताहेर अब्दुल करीम शेख,<br>चौकशी आयोग, क्वॉर्टर नं. ३, निजाम बंगलो, छावणी परिसर, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१२८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०१-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-०४-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-०७-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०८-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात येऊन सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) अन्वये आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी या प्रकरणात नव्याने सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने नव्याने निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०४-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल ताहेर अब्दुल करीम शेख, चौकशी आयोग, क्वॉर्टर नं. ३, निजाम बंगलो, छावणी परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रकाशचंद चांदमल बोथरा,<br>राजीव गांधी चौक, नगर परिषद शॉपिंग सेंटर, गाळा क्रमांक १ व ३, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रकाशचंद चांदमल बोथरा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११-१०-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०९-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित होते. अपिलार्थी यांनी दिनांक ०८-१२-२०११ रोजीच्या पत्रान्व्ये आयोगास विनंती केली होती की, वैयक्तीक कारणामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही त्यामुळे सुनावणी पुढे ढकण्यात यावी. त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन प्रकरणात त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

या पार्श्वभूमीवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम व 19 (7) व 19 (8) (a) अन्वये आयोगास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांनी या प्रकरणात नव्याने सुनावणी घेऊन अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या दृष्टीने नव्याने निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाशचंद चांदमल बोथरा, राजीव गांधी चौक, नगर परिषद शॉपिंग सेंटर, गाळा क्रमांक १ व ३, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, गंगापूर, तालुका गंगापूर,

जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विष्णु नागोजी म्हस्के,<br>समर्थ नगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विष्णु नागोजी म्हस्के | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-०६-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०६-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १२-०७-२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-१०-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०९-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये एकंदर १७ स्वस्त धान्य दुकानाबाबतची माहिती मागितली आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक १२-०७-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, तहसीलदार, कन्नड यांनी उपलब्ध असलेली माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून निधी प्राप्त होताच तात्काळ विनामूल्य द्यावी. परंतु अद्यापपावेतो निधी प्राप्त झालेला नाही. माहितीची २३३२ इतकी पृष्ठे होतात त्याकरिता ४६६४ रुपये इतक्या निधीची मागणी जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे केलेली आहे. मागितलेल्या माहितीची कागदपत्रे पुरविण्याकरिता पूर्वी २३३२० इतका निधी लागेल असे अंदाजे कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक २४-०४-२०११ रोजी अपिलार्थीस माहितीच्या छायांकित प्रती काढण्यास निधी उपलब्ध नसल्याने त्यांनी कार्यालयात येऊन माहितीची पाहणी करावी असेही कळविले आहे. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील असल्यामुळे छायांकीत प्रतीचा येणारा खर्च कार्यालयास सोसावयाचा आहे ही बाब विचारात घेता तसेच अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड यांच्याकडील निधीची उपलब्धता इत्यादी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी. ही पाहणी केवळ अपिलार्थी यांनाच अनुज्ञेय राहील. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (j) नुसार माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असा त्याचा अर्थ होतो. पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात,या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.तसेच भविष्यात मागितलेल्या माहितीच्याकरिता आवश्यक तेवढे

शुल्क कळविण्यात येईल याची दक्षता जन माहिती अधिकारी यांनी घ्यावी,असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विष्णु नागोजी म्हस्के, समर्थ नगर, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश रानोबा सावळे, : अपिलार्थी
रा. उंडणगांव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अधीक्षक भूमि अभिलेख, सिल्लोड, तालुका सिल्लोड,
जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३१२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक भूमि अभिलेख, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. एस. डी. वाघोदे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. पी. डी. औटी, शिरस्तेदार | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०-०७-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | प्रत जोडलेली नाही |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०-०८-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १६-१०-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक ०९-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले होते की, अपिलार्थी यांना मागणी केलेल्या फेरफाराच्या कार्यवाहीची नोंद रजिस्टरमध्ये घेतलेली नाही त्यामुळे ही माहिती त्यांना देता आली नाही. अपिलीय अधिकारी यांनीही अवगत केले होते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे प्रशासकीय अपील केलेले आहे व याबाबतची प्रक्रिया प्रगतीपथावर असून या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२-१२-२०११ रोजी निश्चित केलेली आहे. त्यानतंरच यासंदर्भात होणारा अहवाल सादर करण्यात येईल.

या सर्व बाबींचा विचार करता त्यावेळी आयोगाने या प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला व सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भातील प्रशासकीय कार्यवाही त्यांच्या कार्यालयात प्रगतीपथावर आहे ती अद्याप पूर्ण झाली नसून अंतीम टप्प्यावर आहे व ती पूर्ण झाल्यानतंर जी कागदपत्रे निर्माण होतील त्याचा एक संच अपिलार्थीस विनामूल्य देण्यात येईल. या पार्श्वभूमीवर आयोगाच्या स्तरावर हे प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती त्यांच्याकडे प्राप्त होताच माहितीचा एक संच अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ३१-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश रानोबा सावळे, रा. उंडणगांव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक भूमि अभिलेख, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल,<br>अग्रवाल किराणा स्टोअर्स शेजारी, सोनार गल्ली,<br>पदमपुरा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त परिमंडळ, औरंगाबाद शहर, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. बी. पोळ, बं. नं. १ | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उपायुक्त परिमंडळ, औरंगाबाद शहर, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.५ | त्रयस्थ पक्ष १ - श्री. अजय घनशाम बरंडवाल | : | उपस्थित |
| ३.६ | त्रयस्थ पक्ष २ - श्रीमती मुन्नी जगदीश बंरडवाल | | उपस्थित |
| ३.७ | त्रयस्थ पक्ष ३ - श्री.दिनेश घनश्याम बंरडवाल | | उपस्थित |
| ३.८ | त्रयस्थ पक्ष ४- श्रीमती मीनाबाई घनश्याम बंरडवाल | : | उपस्थित |
| ३.९ | त्रयस्थ पक्ष ५- श्री.विजय जगदीश बंरडवाल | | उपस्थित |
| ३.१० | त्रयस्थ पक्ष ६ - श्री.घनशाम सुरजचंद बंरडवाल | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.११ | त्रयस्थ पक्ष ८ - रविना घनश्याम बंरडवाल | : | उपस्थित |
| ३.१२ | त्रयस्थ पक्ष १०- श्री.सचिन नारायण बंरडवाल | : | उपस्थित |
| ३.१३ | त्रयस्थ पक्ष ११ - श्रीमती रेणू मनोज सोलंकी | : | अनुपस्थित |
| ३.१४ | त्रयस्थ पक्ष १२ - श्री.मनोज अन्नाराम सोलकी | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०३-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०१-०७-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३-०७-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६-०८-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-११-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १४-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व आठ त्रयस्थ उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व दोन त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी उपस्थित त्रयस्थांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

त्रयस्थांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितली आहे ती देण्यात येऊ नये. त्यांनी पुढे असेही कथन केले की, अपिलार्थी आणि ते एकाच गल्लीत राहतात व त्यांच्या वैयक्तीक समन्वयाअभावामुळे ते माहिती मागत आहेत.माहिती वैयक्तीक आहे त्यामध्ये काहीही व्यापक जनहित नाही त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यात येऊ नये.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०५-२०१२ च्या पत्रान्वये आयोगास दिनांक ३१-०५-२०१२ रोजी भारत बंद असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे बंदोबस्ताच्या कामकाजामुळे आयोगापुढे सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नाहीत त्यामुळे सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी वैयक्तीक कारणामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याने पुढील तारीख मागितली आहे. दोन्ही बाजूंची विनंती मान्य करण्यात येत असून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यप्रकाश ताराचंदजी बन्सवाल, अग्रवाल किराणा स्टोअर्स शेजारी, सोनार गल्ली, पदमपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त परिमंडळ, औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विवेकानंद भगवान देशमुख,<br>ए/३ नुपुर अपार्टमेंट, जवाहरनगर पोलीस स्टेशन जवळ,<br>अदिनाथ नगर समोर, गारखेडा, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७-०५-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९-११-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १४-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित

होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी २००१ पासून अर्ज करण्याच्या दिनांकापर्यतची उस्मानाबाद जिल्ह्यातील जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाबाबत विविध एकूण ३० मुद्दयांवर माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०८-२०१० रोजी मिळाली आहे असे दिसून येत आहे व मिळालेली माहिती अपूर्ण आहे असे त्यांनी प्रथम अपिलामध्ये नमूद केलेले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दिनांक ०५-१०-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्या निवासी पत्त्यावर टपाल पोच पावतीव्दारे पोस्टाने पाठविण्यात यावी. याबाबत पुढील प्रगती दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती व कालावधी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (j) नुसार माहितीची पाहणी दिली म्हणजे माहिती दिली असा त्याचा अर्थ होतो. पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील संपूर्ण अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे विनामूल्य छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विवेकानंद भगवान देशमुख, ए/३ नुपुर अपार्टमेंट, जवाहरनगर पोलीस स्टेशन जवळ, अदिनाथ नगर समोर, गारखेडा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रतनकुमार नामदेव साळवे,<br>एफ ४/१४, आयोध्यानगर, एन-७, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०६-१२-२०१०

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १५-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती, अपिलार्थीस आतापर्यंत देण्यात आलेली माहिती, या सर्व बाबींचा विचार करुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय पारीत करावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रतनकुमार नामदेव साळवे, एफ ४/१४, आयोध्यानगर, एन-७, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे,<br>तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ<br>हॉस्पिटलसमोर, उल्कानगरी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वार्ड अभियंता, वार्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, (ई व फ), महानगरपालिका,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१३६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>वार्ड अभियंता, वार्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, (ई व फ), महानगरपालिका,<br>औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१२-२०१० |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक १५-१२-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्याने त्यावेळी सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पिटल समोर, उल्कानगरी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा वार्ड अभियंता, वार्ड फ, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (ई व फ), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ए. ए. पंडीत, : अपिलार्थी

रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी, :

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ए. ए. पंडीत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०२-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०८-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०६-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-११-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रकरणात अपिलार्थीची बाजू ऐकून घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यासाठी व तसेच माहिती अर्जाच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांची प्रमुख जबाबदारी आहे त्यामुळे त्यांनी स्वत: उपस्थित राहावे, जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ असतात त्यांच्या कार्यालयीन कामकाजाची त्यांना माहिती असल्याने त्यांनी मांडलेली बाजू सुध्दा महत्वाची ठरते, त्यामुळे त्यांनीही सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक राहील,या आदेशासह प्रकरणात सुनावणाकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना माहिती मिळालेली नाही असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले आहे, या सर्व बाबी विचारात घेता प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्याचा निर्णय आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिश: उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ३१-०५-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए. ए. पंडीत, रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ए. ए. पंडीत, : अपिलार्थी

रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२

जन अपिलीय अधिकारी, :

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४३३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१-०५-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ए. ए. पंडीत | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११-०२-२०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १७-०२-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०८-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३-०६-२०११ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापुर्वी दिनांक २४-११-२०११ रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी सुनावणीस अपिलार्थी, संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रकरणात अपिलार्थीची बाजू ऐकूा घेण्याकरिता त्यांना एक संधी देण्यासाठी व तसेच माहिती अर्जाच्या संबंधात जन माहिती अधिकारी यांची प्रमुख जबाबदारी आहे त्यामुळे त्यांनी स्वतः उपस्थित राहावे, जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ असतात त्यांच्या कार्यालयीन कामकाजाची त्यांना माहिती असल्याने त्यांनी मांडलेली बाजू सुध्दा महत्वाची ठरते, त्यामुळे त्यांनीही सुनावणीस उपस्थित राहणे आवश्यक राहील या आदेशासह प्रकरणात सनावणाकरिता पुढील तारीख देण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी आुपस्थित आहेत. अपिलार्थी यांना माहिती मिळालेली नाही असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले आहे, या सर्व बाबी विचारात घेता प्रकरणात सुनावणीकरिता पुढील तारीख देण्याचा निर्णय आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २५-०७-२०१२ रोजी सकाळी ११-३० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०५-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ए. ए. पंडीत, रामतारा हाऊसिंग सोसायटी, घर क्रमांक २४, शहानुरवाडी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (विधी), विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.